

सातारा : सायबर सुरक्षा जागृती कार्यक्रमामध्ये प्रा. दशरथ सगरे, प्रा. अजिंक्य सगरे, नीलेश तांबे, श्रद्धा माने व इतर.

# यशोदाच्या विद्यार्थ्यांकडून सायबर सुरक्षेचा जागर

**सातारा : पुढारी वृत्तसेवा**

यशोदा टेक्निकल कॅम्पसमधील संगणक शास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी क्विक हिल फाऊंडेशन व महाराष्ट्र पोलिस सायबर सेल यांच्या समन्वयाने विविध उपक्रमांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचा जागर सुरु केला आहे. कॅम्पसमध्ये आयोजित आरंभ २०२४ या कार्यक्रमातही विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेची माहिती दिली.

पथनाट्यातून, प्रभात फेरीच्या माध्यमातून सायबर सुरक्षेबाबतची माहिती युवकांपर्यंत पोहोचवली. तसेच लोकांना इंटरनेट हॅकर्सचे शिकार होण्यापासून वाचवण्यासाठी आपल्याला आलेला ओटीपी किंवा आपला आधार नंबर कोणालाही सांगू नये, असा संदेशही लोकांपर्यंत पोहोचवला. सायबर सुरक्षेची प्रतिज्ञा देण्यात आली.

तसेच सायबर कोड देवून क्विक हिलची सायबर पुस्तिका डाऊनलोड करुन देण्यात आली. यावेळी सातारा शहरचे पो.नि. नीलेश तांबे, सायबरच्या पो.नि. श्रध्दा माने, गणेश कचरे, महेश पवार, संस्थेचे अध्यक्ष प्रा. दशरथ सगरे, उपाध्यक्ष प्रा. अजिंक्य सगरे, डॉ. विवेक रेदासानी, प्राचार्य डॉ. विक्रम पाटील, प्रा. आर. डी. मोहिते, गणेश सुरवसे, डॉ. सरिता बलशेटवार, प्रा. विकास चव्हाण उपस्थित होते.